वैद्यकीय विद्या शाखेच्या लेखी परीक्षा आजपासून

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र-२०२५ च्या तिसऱ्या टप्प्यातील लेखी परीक्षा दोन ते १८ ऑगस्ट या कालावधीत राज्यातील एकूण ५३ केंद्रांवर होणार आहेत. यामध्ये साडेआठ हजारपेक्षा अधिक विद्यार्थी प्रविष्ठ होणार आहेत.

उन्हाळी -२०२५ (टप्पा - दोन) अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे परीक्षा केंद्रावर पेपर सुरु होण्याआधी यशस्वीरीत्या पाठविण्यात आल्या, तसेच ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करुन तपासण्याचे काम प्रगतीपथावर आहे. याच धर्तीवर, उन्हाळी-२०२५ टप्पा-तीन व्दितीय वर्ष एमबीबीएसच्या (जुना अभ्यासक्रम २०१९, २०२३) परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या दिवशी पाठविण्यात येतील, असे परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एक तास अगोदर म्हणजेच सकाळ सत्रासाठी सकाळी नऊ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

तरुणाची भर रस्त्यात हत्या

तीन संशयित ताब्यात

मालेगाव येथे हत्या झालेल्या ठिकाणी पोलीस पंचनामा करताना.

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : वारंवार घडणाऱ्या गोळीबाराच्या घटना, चोऱ्या तसेच भ्रमणध्वनी, सोनसाखळी खेचण्याचे प्रकार शहरात नित्याचे झाले असतानाच गुरुवारी रात्री नानावटी पेट्रोल पंपाजवळ अत्यंत गजबजलेल्या जुना राष्ट्रीय महामार्गावर मोतीबाग नाका भागात युवकाची दुचाकीवरुन आलेल्या तिघांनी हत्या केल्याने मालेगाव हादरले. तिघा मारेकऱ्यांनी धारदार शस्त्र व लाकडी दांडक्याने या तरुणावर आधी हल्ला केला. नंतर डोक्यात दगड घालून हत्या केल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली.

नितीन निकम (२५) असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. मध्यरात्री रस्त्याच्या कडेला तो उभा असताना दुचाकीवरून तीन जण तेथे आले. हातातील लाकडी दांडके आणि धारदार शस्त्राने नितीनवर त्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात तो जमिनीवर कोसळला. नंतर मारेकऱ्यांनी जवळच पडलेला दगड उचलून त्याच्या डोक्यात घातला. हल्ल्यानंतर तिघे मारेकरी दुचाकीवर बसून पसार झाले. हल्ल्यात नितीनचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्याची माहिती समजताच छावणी पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

पोलिसांनी गुन्हा दाखल करून सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे मारेकऱ्यांचा शोध सुरू केला. त्यानुसार सचिन अहिरे, परेश पगारे आणि केतन अहिरे (तिघे रा. मालेगाव) यांना ताब्यात घेतले. हत्येचे नेमके कारण समजू शकले नसले तरी पूर्ववैमनस्यातून हा प्रकार घडला असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात आली आहे.

गुन्हेगारीत वाढ, नागरिकांची मागणी

काही दिवसांपासून शहर परिसरात गुन्हेगारीचा आलेख वाढत आहे. गोळीबाराच्या घटना, चोऱ्या यामुळे मालेगावकर त्रस्त झाले आहेत. हे गुन्हे रोखण्याचे आव्हान पोलिसांसमोर असतानाच महामार्गावर हत्येची घटना घडली. सीसीटीव्हीतील हत्येचे चित्रण बघितल्यावर शहरातील गुन्हेगारी प्रवृत्ती कोणत्या थराला गेली, यावर प्रकाश पडत आहे. गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांबद्दल शहरवासीयांमध्ये भीती तसेच चिंतेचे वातावरण आहे. शहरातील बिघडत चाललेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

समृद्धी महामार्गावर अपघातात एक जण ठार

नाशिक : नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर सिन्नर तालुक्यात गुरुवारी रात्री मालवाहू वाहन अपघातग्रस्त होऊन सहायक चालकाचा जागीच मृत्यू झाला. तर चालक गंभीर जखमी झाला.

छत्रपती संभाजीनगर येथून कृषिमालाची वाहतूक करणारे वाहन मुंबईकडे निघाले असताना रात्री एक वाजता सिन्नर तालुक्यातील मरळ शिवारात चालक शाहरुख पठाण (२४, खेड, पैठण) याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. वाहन लगतच्या लोखंडी जाळीला धडकले. यात गाडीचा चक्काचूर झाला. अपघातात चालक पठाण याच्यासह सहायक फिरोज बादशहा (३२, मुगी, पैठण) हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने दोडी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तत्पूर्वीच फिरोज बादशहा यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून घोषित केले. या प्रकरणी वावी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नऊ लाखांचा ऐवज लंपास

नाशिक : शहरात घरफोडीचे सत्र सुरू असून अशोकनगर भागात झालेल्या घटनेत चोरट्यांनी सुमारे नऊ लाखाचा ऐवज लंपास केला. याबाबत चंद्रशेखर वैष्णव (राज्य कर्मचारी सोसायटी, अशोकनगर) यांनी तक्रार दिली. चोरट्यांनी वैष्णव यांच्या घरात शिरून डब्यात ठेवलेले सुमारे आठ लाख ९६ हजार रुपयांचे दागिने चोरले. याप्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरात मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत ढोलपथकाने लक्ष वेधले. (छायाचित्र- यतीश भानू)

कळवण भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचारी लाच स्वीकारताना जाळ्यात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : जमिनीचा मोजणी अहवाल वरिष्ठांना सादर करण्यासाठी आठ हजार रुपयांची मागणी करून त्यातील तीन हजार रुपये स्वीकारताना कळवण भूमी अभिलेख कार्यालयातील नगर भूमापन लिपीक विजय गवळीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. या कार्यालयात लक्ष्मीदर्शनाशिवाय कुठलेही काम होत नसल्याची सामान्यांची भावना आहे.

तक्रारदाराने विक्री केलेल्या वडिलोपार्जित जमिनीच्या मोजणीचा वाद कळवण येथील सहदिवाण न्यायालयात २०२२ पासून सुरू आहे. न्यायालयाने वाद व प्रतिवादी यांच्या जमिनीची मोजणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश नोव्हेंबर २०२४ मध्ये कळवणच्या भूमी अभिलेख कार्यालयाचे तालुका अधीक्षकांना दिले होते. या जमिनीची मोजणी २१ मे २०२५ रोजी भूमी अभिलेख कार्यालयातील नगर भूमापन लिपीक विजय गवळी याने केली. यासंदर्भातील अहवाल उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे सादर करण्यासाठी गवळीने आठ हजार रुपयांची लाच मागितली होती.

यासंदर्भात तक्रार आल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पंचांसमक्ष पडताळणी केली असता मोजणी अहवाल वरिष्ठांना सादर करण्यापूर्वी तीन हजार रुपये लाच म्हणून द्यावे लागतील आणि अहवाल वरिष्ठांना सादर केल्यानंतर उर्वरित रकमेच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. गवळीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक संतोष पैलकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. सापळा पथकात हवालदार दिनेश खैरनार, प्रफुल्ल माळी, अविनाश पवार यांचा समावेश होता.

लाचखोरीचे वाढते प्रमाण

भूमी अभिलेख कार्यालयातील लाचखोरी काही वर्षांपासून चर्चेत आहे. दोन ते तीन वर्षांत या विभागाचे प्रभारी उपसंचालक, लिपीक, प्रतिलिपी लिपीक असे अनेक अधिकारी-कर्मचारी लाच स्वीकारताना पकडले गेले. या कार्यालयात नागरिकांची कुठलीही कामे सहजपणे होत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनेकदा कारवाई होऊनही या विभागाच्या कारभारात कुठलाही बदल झालेला नाही.

मालेगावातील 'शहीद हेमंत करकरे मार्ग' नामकरणाची कहाणी

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : शहरातील भिकू चौक भागात २९ सप्टेंबर २००८ रोजी बॉम्बस्फोट झालेल्या ठिकाणच्या रस्त्याचे १५ वर्षांपूर्वी 'शहीद हेमंत करकरे मार्ग' असे नामकरण करण्यात आले. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख असताना करकरे यांनी या बॉम्बस्फोट गुन्ह्याचा तपास केला होता. करकरे यांचे नाव मालेगावातील रस्त्याला मिळण्याची कहाणी मोठी रंजक आहे.

रमजान ईदच्या २८ व्या रोजाच्या दिवशी खरेदीसाठी सायंकाळनंतर मोठी गर्दी बाजारात उसळली होती. त्या दिवशी रात्री ९.३५ वाजेच्या सुमारास शहरातील भिकू चौक भागात बॉम्बस्फोट झाला. यात सहा जणांचा बळी गेला. तसेच शंभरावर लोक जखमी झाले.

प्रारंभी स्थानिक पोलिसांकडे हा तपास होता. नंतर राज्याच्या दहशतवाद विरोधी पथकाकडे तपास सुपूर्द करण्यात आला. एका दुचाकीवर ठेवलेल्या स्फोटकांच्या सहाय्याने हा बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आल्याची माहिती तपासातून पुढे आली. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख म्हणून करकरे यांनी या प्रकरणाचा तपास केला. ही दुचाकी साध्वी प्रज्ञा यांच्या नावे नोंदणीकृत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर साध्वी, कर्नल पुरोहित आणि अन्य हिंदुत्ववादी संघटनांशी संबंधित एकूण सात जणांचा या कृत्यात समावेश असल्याचा ठपका ठेवून त्यांना अटक करण्यात आली होती. या खटल्याची सुनावणी पूर्ण होऊन जवळपास १७ वर्षांनंतर विशेष न्यायालयाने या खटल्यातील सर्व संशयितांना निर्दोष ठरविले. मालेगाव बॉम्बस्फोटानंतर दोन महिन्यांनी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत दहशतवादी हल्ला झाला होता.

या हल्ल्यात हेमंत करकरे, अनिल कामटे हे वरिष्ठ पोलीस अधिकारी शहीद झाले. मालेगाव बॉम्बस्फोटाचा तपास कालांतराने राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे गेला. तथापि, करकरे यांनी या प्रकरणी केलेल्या तपासाविषयी विशेषतः शहरातील मुस्लिम समुदायात त्यांच्याबद्दल एक आदर निर्माण झाला होता. त्यामुळे ते शहीद झाल्यावर मालेगावकरांना मोठा धक्का बसला होता. त्यांच्याप्रती आदरभाव आणि त्यांच्या स्मृती जिवंत राहाव्यात म्हणून भिकू चौक ते नेहरू चौक या रस्त्याचे 'शहीद हेमंत करकरे मार्ग' असे नामकरण करण्याची कल्पना पुढे आली.

पार्श्वभूमी

१७ डिसेंबर २००८ रोजी महापालिकेच्या मासिक सभेत नामकरणाचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. तेव्हा महापालिकेत तिसरा महाज या संघटनेची सत्ता होती. या पक्षाचे नजमुद्दीन खजुरवाले हे महापौर होते. या ठरावानुसार काही दिवसांतच नामफलकाचे अनावरण करण्यात आले होते. या कार्यक्रमास मौलाना मुफ्ती इस्माईल, तत्कालीन आयुक्त जीवन सोनवणे उपस्थित होते. २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील शहिदाचे एखाद्या रस्त्याला नाव देणारे मालेगाव हे राज्यातील एकमेव उदाहरण असावे.

नाशिक महापालिकेत स्वबळासाठी भाजपची व्यूहरचना

अनिकेत साठे, लोकसत्ता

नाशिक : शिवसेनेतील (उद्धव ठाकरे) प्रमुख पदाधिकाऱ्यांचा प्रवाह भाजपकडे वळवून मंत्री गिरीश महाजन यांनी मित्रपक्ष शिवसेनेला (एकनाथ शिंदे) महानगरपालिका निवडणुकीत अधिकची संधी मिळणार नाही, याची खबरदारी घेतली आहे. शिंदे गटाने महाजन यांच्या पालकमंत्रीपदात खोडा घातला होता. त्याची परतफेड या निवडणुकीत करण्यासाठी भाजपचे संकटमोचक महाजन हे सज्ज झाल्याचे चित्र आहे.

महायुती सरकारमध्ये नाशिक आणि रायगडचे पालकमंत्रीपद संघर्षाचे कारण ठरले आहे. तिन्ही पक्षांच्या दाव्यामुळे नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा सुटलेला नाही. तूर्तास सिंहस्थ कुंभमेळ्याच्या जबाबदारीतून महाजन नाशिकवर प्रभाव ठेवत आहेत. महायुतीतील बेबनाव महानगरपालिका निवडणुकीत अधिक स्पष्टतेने समोर येणार आहे. महाजन यांनी चालविलेली तयारी पाहता भाजपकडून महानगरपालिकेची निवडणूक एकत्रित लढण्याची सुतराम शक्यता नाही. ठाकरे गटाचे सुनील बागूल, माजी महानगरप्रमुख मामा राजवाडे यांच्या पक्ष प्रवेशावेळी महाजनांनी राज्यात भाजपचे सर्वाधिक नगरसेवक नाशिकमधून निवडून आणण्याचा विक्रम रचण्याचे सुतोवाच केले. गतवेळी भाजपचे ६७ नगरसेवक होते. यावेळी हा आकडा १०० पार नेण्याच्या दृष्टीने नियोजन होत आहे.

कमकुवत प्रभाग शोधून सुधाकर बडगुजर यांच्यासारख्या वादग्रस्त मंडळींनाही सामावून भाजपने ठाकरे गटच नव्हे तर, शिंदे गटालाही धक्का दिला. बागूल, राजवाडे यांच्यासह माजी नगरसेवकांना भाजपमध्ये खेचून बेरजेच्या राजकारणावर लक्ष केंद्रीत केले आहे. पुढील दीड वर्षांनी नाशिकमध्ये कुंभमेळा होत असल्याने नाशिक महापालिकेच्या निवडणुकीला महत्व प्राप्त झाले आहे. देशभरातून कोट्यवधी भाविक कुंभनगरीत येतील. यासाठी महापालिकेने सुमारे १५ हजार कोटींचा आराखडा तयार केला आहे. कुंभमेळा नियोजनाची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच गिरीश महाजन यांच्यावर सोपवली आहे. कुंभमेळा तयारीला वेग देण्यासाठी महापालिकेवर वर्चस्व राखणे भाजपला क्रमप्राप्त ठरेल. शिवसेनेचाही (एकनाथ शिंदे) तसाच प्रयत्न आहे.

ठाकरे गटाबरोबर अन्य पक्षांतील माजी नगरसेवकांनाही सामावून प्रभागनिहाय समीकरणे जुळवली जात आहेत. पालकमंत्रीपदापासून वंचित राहावे लागलेले मंत्री दादा भुसे हे निवडणूक तयारीत महाजनांप्रमाणे रस घेताना दिसत नाहीत. शिंदे गटात संघटनात्मक पातळीवर गटबाजीला उधाण आले आहे. मित्रपक्ष राष्ट्रवादीचा (अजित पवार) शहरात फारसा प्रभाव नाही. याचा पुरेपूर लाभ उठविण्याची तयारी भाजपने केली आहे. नाशिक भाजप 'हाऊसफुल्ल' झाल्याचे महाजनांचे सांगणे तेच अधोरेखित करते.

स्थानिक पातळीवर 'एकला चलो रे'

मागील निवडणूक भाजप आणि एकसंघ शिवसेना स्वतंत्रपणे लढले होते. भाजपने एकहाती सत्ता मिळवली होती. तर शिवसेनेला विरोधी पक्षात बसावे लागले होते. यावेळी भाजप-शिवसेना शिंदे गट परस्परांविरोधात मैदानात उतरण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणुका महायुती एकत्र लढविणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह इतर अनेक नेते सांगत असले तरी स्थानिक पातळीवर मात्र 'एकला चलो रे' या मानसिकतेत महायुतीतील तिन्ही पक्ष असल्याचे दिसते.

भारत सरकार
आर्थिक व कंपनी व्यवहार मंत्रालय
आर्थिक व्यवहार विभाग (बँकिंग विभाग)
मुंबई ऋण वसुली न्यायाधिकरण नं. १
एमटीएनएल भवन, दुसरा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई- ४००००५.
२०२१च्या वसूली प्रक्रिया नं. ७९ मधील
फॉर्म नं. १६ जप्ती अधिपत्र (वॉरंट)

एक्झिबीट नं. १६
पुढील तारीख २२.०८.२०२५

पंजाब नॅशनल बँक — **प्रमाणपत्र धारक**
विरुद्ध
म्यूज डड्स प्रा. लि. व अन्य — **प्रमाणपत्र ऋणको**

प्रति,
ज्याअर्थी, तुम्ही प्रतिवादी, ऋण वसूली न्यायाधिकरण नं. १ मुंबईच्या पीठासीन अधिकारीद्वारा काढलेल्या २०१६चा टी.ओ.ए. नं. ३४९ मधील वसूली प्रमाणपत्रानुसार तुमच्याद्वारा देय असलेली किंमत व व्याजासह रक्कम **रु. ४,३५,१९,०००.०० (रुपये चार कोटी पसतीस लाख एकोणीस हजार फक्त)** या रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला आहात.
याखाली नमूद केलेली मालमत्ता वरील प्रकरणात निम्नस्वाक्षरीकाराद्वारे जप्त केली आहे आणि त्यावर आकार निर्मिती करण्यात आली आहे.
असा आदेश देण्यात आला आहे की, तुम्हास याद्वारा कोणत्याही तऱ्हेने याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा घेणे किंवा तिच्या हस्तांतरणापासून निम्नस्वाक्षरीकारांच्या पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित केले आहे व मनाई केली आहे आणि असणाऱ्या सर्व व्यक्ती व त्यांना सदर हस्तांतरण किंवा ताबा अंतर्गत कोणताही लाभ घेण्यापासून प्रतिबंधित केले आहे.
हे अधिपत्र (वॉरंट) २२.०८.२०२५ रोजी परत करण्यायोग्य आहे.

स्थावर मालमत्तेची अनुसूची
डुप्लेक्स फ्लॅट नं. सी-६, दुसरा मजला, दुर्गेश रेसिडेन्सी, प्लॉट नं. २५, सर्व्हे नं. ६३/२, व्हिलेज आनंदवली, नाशिक- ४२२०१३. प्रमाणपत्र ऋणको नं. २ च्या मालकीचे.

जंगम मालमत्तेची अनुसूची
१. कार निस्सान इवलिया एक्स डिझेल धारण केलेला नोंदणी क्र. एमएच०४जीजे८३३०
२. कार निस्सान इवलिया एक्स डिझेल धारण केलेला नोंदणी क्र. एमएच०४जीजे८५३०
आज दिनांक २१ जुलै, २०२५ रोजी माझ्या हस्ते व मोहोरनिशी दिलेले

शिक्का
(श्री. महेश कुमार) वसूली अधिकारी
डीआरटी-१, मुंबई

यांच्याकरिता एक प्रत: फ्लॅटच्या प्रकरणातील आर. सी. हाऊसिंग सोसायटीनुसार सर्व प्रतिवादी यांच्याकरिता एक प्रत:
१. म्यूज डड्स प्रायव्हेट लिमिटेड
असलेले तिचे नोंदणीकृत कार्यालय: सी - २३, शुभदा सीएचएस, सर पोचकनवाला रोड, वरळी, मुंबई- ४०००३० **आणि तिचे सध्याचे कार्यालय येथे असलेले:** ५२४, ५वा मजला, सी- १, सोहम प्लाझा, चितलसर, मानपाडा, ठाणे (पश्चिम), ठाणे- ४००६१०.
२. श्रीमती काव्या अमित दिग्विजय सिंह
राहणार- फ्लॅट नं. ४०४, पंजुमहल पॅनस्टॅण्ड, गॅलक्सीजवळ, बांद्रा (पश्चिम), मुंबई- ४०००११.
३. श्री. विजय दशरथ भगत
राहणार- सी- ६, दुसरा मजला, दुर्गेश रेसिडेन्सी, गंगापूर रोड, आनंदवली, नाशिक-४२२००९.

भारत सरकार
आर्थिक व कंपनी व्यवहार मंत्रालय
आर्थिक व्यवहार विभाग (बँकिंग विभाग)
मुंबई ऋण वसुली न्यायाधिकरण नं. १
एमटीएनएल भवन, दुसरा मजला, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई-४०० ००५.
२०२१च्या वसुली प्रक्रिया नं. ७७ मधील
फॉर्म नं. १६ जप्ती अधिपत्र (वॉरन्ट)

एक्झिबीट नं. १२
पुढील तारीख २१.०८.२०२५

पंजाब नॅशनल बँक — **प्रमाणपत्र धारक**
विरुद्ध
मिटिगेट ट्रेडिंग प्रा. लि. व अन्य — **प्रमाणपत्र ऋणको**

प्रति,
ज्याअर्थी, तुम्ही प्रतिवादी, ऋण वसुली न्यायाधिकरण नं. १ मुंबईच्या पीठासीन अधिकारीद्वारा काढलेल्या २०१६चा टी.ओ.ए. नं. ३४८ मधील वसुली प्रमाणपत्रानुसार तुमच्याद्वारा देय असलेली किंमत व व्याजासह रक्कम **रु. ९,८१,७५,०००.०० (रुपये नऊ कोटी एक्याऐंशी लाख पंचाहत्तर हजार फक्त)** या रकमेचे प्रदान करण्यास असमर्थ ठरला आहात.
याखाली नमूद केलेली मालमत्ता वरील प्रकरणात निम्नस्वाक्षरीकारांद्वारे जप्त केली आहे आणि त्यावर आकार निर्मिती करण्यात आली आहे.
असा आदेश देण्यात आला आहे की, तुम्हास याद्वारा कोणत्याही तऱ्हेने याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा ताबा घेणे किंवा तिच्या हस्तांतरणापासून निम्नस्वाक्षरीकारांच्या पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित केले आहे व मनाई केली आहे आणि असणाऱ्या सर्व व्यक्ती व त्यांना सदर हस्तांतरण किंवा ताबाअंतर्गत कोणताही लाभ घेण्यापासून प्रतिबंधित केले आहे.
हे अधिपत्र (वॉरन्ट) २१.०८.२०२५ रोजी परत करण्यायोग्य आहे.

स्थावर मालमत्तेची अनुसूची
डुप्लेक्स फ्लॅट नं. १ ते ४, तळमजला, पहिला मजला व दुसरा मजला, दिगेश टॉवर्स, प्लॉट नं. २५, सर्व्हे नं. ३६/१, व्हिलेज आनंदवली, गंगापूर रोड, नाशिक-४२२००५.
आज दिनांक ०२ जुलै, २०२५ रोजी माझ्या हस्ते व मोहोरनिशी दिलेले
मोहोर

(श्री. महेश कुमार)
वसुली अधिकारी
डीआरटी-१, मुंबई

यांच्याकरिता एक प्रत: फ्लॅटच्या प्रकरणातील आर. सी. हाऊसिंग सोसायटीनुसार सर्व प्रतिवादी यांच्याकरिता एक प्रत:
१. मिटिगेट ट्रेडिंग प्रायव्हेट लिमिटेड
असलेले तिचे नोंदणीकृत कार्यालय: सी-२३, शुभदा सीएचएस, पहिला मजला, आयटीओ ऑफिसजवळ, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-४०० ०३०.
आणि तिचे सध्याचे कार्यालय येथे असलेले: ५२४, ५वा मजला, सी-१, सोहम प्लाझा, चितळसर, मानपाडा, ठाणे (पश्चिम), ठाणे-४०० ६१०.
२. दिगेश कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड,
असलेले तिचे नोंदणीकृत कार्यालय: ऑफिस नं. ११०३, आशादिप बिल्डिंग, ९ हैले रोड, नवी दिल्ली-११० ००१.
३. श्री. युवराज जिवानंद ओले,
राहणार: फ्लॅट नं. १, आनंदवली, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ००५.
४. श्री. रवींद्र विश्वास माळी,
राहणार: फ्लॅट नं. सी-४, दुर्गेश रेसिडेन्सी, गंगापूर रोड, गो गोमांतक हॉटेलजवळ, आनंदवली, नाशिक-४२२ ००८.

फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेड
PhoenixARC
नोंदणीकृत कार्यालय : तिसरा मजला, वॉलेस टॉवर्स (पूर्वीची शिव बिल्डिंग म्हणून ज्ञात असलेली), १३९/१४०/बी/१, सहार व वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेचे क्रॉसिंग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.

सरफेसी ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत मागणी सूचना

तुम्ही याखाली नमूद केलेले ऋणको, सह-ऋणकोंनी तुमची स्थावर मालमत्ता (प्रतिभूती) गहाण ठेवून याखाली अधिक तपशीलवारपणे वर्णिलेल्या मोतिलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडकडून कर्ज सुविधांचा लाभ घेतला आहे. परिणामी तुम्ही कर्ज रकमेच्या परतफेडीत कसूर दाखविल्यामुळे, तुमच्या कर्ज खात्यांचे नॉन-परफॉर्मिंग ॲसेट्स म्हणून वर्गीकरण करण्यात आले होते आणि त्यानंतर याखाली नमूद केलेल्या स्वतंत्र अभिहस्तांकन करारनाम्याद्वारे, सदर स्थावर मालमत्ता रकमेच्या परतफेडीकरिता स्थावर मालमत्तेसंबंधित निर्मिती केलेल्या अंतर्निहित सुरक्षा हितासह उक्त कर्जाच्या लाभाकरिता तुमच्याद्वारा निष्पादित केलेल्या कागदपत्रांनुसार तुमच्याकडून प्राप्त करण्यायोग्य सर्व हक्क, नामाधिकार, हित, देणी फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेडच्या नावे (याखाली सविस्तररीत्या नमूद केल्यानुसार विविध न्यासाचे विश्वस्त म्हणून कार्यरत असलेली) (फिनिक्स) अभिहस्तांकित करण्यात आले आहेत. फिनिक्सने, उक्त अभिहस्तांकनानुसार आणि थकीत देणींच्या वसुलीकरिता सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट) अंतर्गत **दिनांकित ०३.०७.२०२५ मागणी सूचना** निर्गमित केली आहे, त्यातील समाविष्ट तपशिलाची तुम्हास सेवा देऊन आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ३(१) यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३(२)नुसार यासह प्रसिद्धी देण्यात येत आहे.
न्यास, ऋणको, सह-ऋणको, गहाणवट मालमत्ता, थकीत देणी इ. तपशील व मागणी सूचना सेक्शन १३(२) अंतर्गत पाठविण्यात आली आहे आणि दावा केलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे :

ट्रस्टचे नाव	कर्ज खाते क्रमांक/ ऋणको/ सह-ऋणकोचे नाव	सुरक्षित मत्तेचा तपशील	०३.०७.२०२५ रोजीप्रमाणे मूळ थकबाकी रक्कम	०३.०७.२०२५ रोजीप्रमाणे थकीत ईएमआय + अन्य आकार	०३.०७.२०२५ रोजीप्रमाणे एकूण थकीत देणी
फिनिक्स ट्रस्ट - एफवाय २२-२२	LXNAS00316-170023109 / ऋणको : दिवंगत विठ्ठल काशिनाथ रोकडे सह-ऋणको : सुरेखा विठ्ठल रोकडे	मिळकत नं. ७३/३ व ७३/२, एरिया मोजमापाचा ७०.२६ चौ.मी., येथे स्थित- लोनवाडी, मौजे लोनवाडी, ता. निफाड, जि. नाशिक-४२२ ३०३.	रु. ८,०८,४२९/-	रु. ३६,३३९/-	रु. ८,४४,७६८/-

तुम्हास ऋणको/ सह-ऋणको/ हमीदारांना त्यामुळे या सूचनेच्या ६० (साठ) दिवसांच्या आत संपूर्ण यावर नमूद केल्यानुसार पुढील व्याजासह मागणी केलेल्या रकमेचे प्रदान करण्यास फर्माविण्यात आले आहे, त्यास असमर्थ ठरल्यास, निम्नस्वाक्षरीकारांस वर नमूद केलेल्या प्रतिभूतींवर अंमलबजावणी करण्याकरिता ॲक्टअंतर्गत कारवाई करण्यास भाग पडणार आहे. तुमचे ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे लक्ष वेधीत आहोत, ज्याआधारे तुम्हास पूर्वोक्त तरतुदींमध्ये निर्धारित कालावधीच्या आत सुरक्षित मत्तेच्या विमोचनास स्वातंत्र्य आहे. कृपया नोंद घ्यावी की, उक्त ॲक्टच्या सेक्शन १३(१३)नुसार, आमच्या संमतीशिवाय तुम्हास विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरणापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे.
स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : ०२.०८.२०२५
भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.
फिनिक्स एआरसी प्रायव्हेट लिमिटेडकरिता
प्राधिकृत अधिकारी

निडो होम फायनान्स लिमिटेड
nido HOME FINANCE
(आधी एडलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) नोंदणीकृत कार्यालय: टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०. प्रादेशिक कार्यालय: कार्यालय क्र. ४०७-४१०, ४था मजला, काकडे बिझ आयकॉन, सीटीएस २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार सह-कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येत आहे की, कर्जाची थकबाकी वसूल होईपर्यंत सोबतच्या रकान्यात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेली मालमत्ता **"जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "तिथे जे काही आहे"** या तत्त्वांवर विक्री करण्यात येईल. कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जासाठी सदर ही मालमत्ता **निडो होम फायनान्स लिमिटेड (आधी एडेलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोकडे खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव	वसुलीची रक्कम	आरक्षित किंमत आणि ईएमडी	लिलावाची तारीख आणि वेळ
१.	शिवाजी विठ्ठलराव भगत (कर्जदार) आणि सुचिता शिवाजी भगत (सह-कर्जदार)	एलएएन क्र. एलएनएसकेएसटी००००४८६८१ याकरिता **रु. २९,८०,८०५/-** (रुपये एकोणतीस लाख ऐंशी हजार आठशे पाच फक्त) आणि **एलएएन क्र. एलएनएसकेएसटीएच००००४८८४१** याकरिता रु. १३,४८,७३१/- (रुपये तेरा लाख अठ्ठेचाळीस हजार सातशे एकतीस फक्त) दि. ३१.०७.२०२५ रोजीनुसार + त्यावरील पुढील व्याज + कायदेशीर खर्च	रु. ३२,७३,०००/- (रुपये ब